महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका, मुख्य इमारत
शिवाजी नगर पुणे - ४११००५
Email id
:mco@punecorporation.org
फोन क्र. ०२०- २५५०११००
जावक क्र. मआ/साप्रवि/४८२३
दिनांक : ०९/१०/२०२०

## आदेश

**विषय:-** <u>कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाच्या प्रतिबंध व नियंत्रण याबाबतचे सुधारित आदेश-लॉकडाऊन टप्प्याटप्याने उठविणे आणि या कालावधीत प्रतिबंधने कमी करणेबाबत (मिशन बिगिन अगेन).</u>

संदर्भ :- १) अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग,गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,मंत्रालय मुंबई क्रमांक कोरोना २०२०/प्र क्र.५८/आरोग्य- ५, दिनांक १४ मार्च २०२०

२) आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५

३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम,१८९७

४) महसूल व वनविभाग,महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र. DMU/2020/CR.92/DISM-1/दिनांक १७ एप्रिल २०२०, २१ एप्रिल २०२०,२९ जून २०२०,६ जुलै २०२०, ३१ जुलै २०२०, ३१ ऑगस्ट २०२०, ३० सप्टेंबर २०२०

५) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/२९२३, दि.३१.०७.२०२०

६) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/२९३३, दि.०१.०८.२०२०

७) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/२९३४, दि.०३.०८.२०२०

८) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/२९६४, दि.०४.०८.२०२०

९) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/३३६१, दि.१७.०८.२०२०

१०) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/३७९१, दि.०२.०९.२०२०

११) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/४६१५,
दि.०१.१०.२०२०

१२) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/४६२३,
दि.०४.१०.२०२०

मे. राज्य शासनाच्या संदर्भ क्र. ४ च्या आदेशाच्या अनुषंगाने संदर्भ क्र. ११ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदर आदेशात **मी विक्रम कुमार, आयुक्त, पुणे महानगरपालिका,** खालीलप्रमाणे सुधारित आदेश निर्गमित करीत आहे.

१. पुणे महानगरपालिका क्षेत्रातील प्रतिबंधित क्षेत्राबाहेरील सर्व अत्यावश्यक वस्तूंची दुकाने / सेवा जसे, औषधे विक्री दुकाने, दवाखाने यापूर्वी दिलेल्या परवानगीनुसार त्यांच्या वेळेत दररोज सुरु राहतील.
२. पुणे महानगरपालिका क्षेत्रातील प्रतिबंधित क्षेत्राबाहेरील अन्य अत्यावश्यक वस्तूंची दुकाने / सेवा (औषधी विक्री दुकाने, दवाखाने वगळून ), अत्यावश्यक सेवा दुकानाव्यतिरिक्त इतर वस्तूंची दुकाने, त्याकरिता निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार सकाळी ०९:०० ते रात्री ०९:०० या वेळेत खुली राहतील.
३. शॉपिंग मॉल, मार्केट कॉम्प्लेक्स, त्याकरिता निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार सकाळी ०९:०० ते रात्री ०९:०० या वेळेत सुरु राहतील. तथापि त्यामधील सिनेमागृह बंद राहतील.
४. पुणे महानगरपालिकेकडून यापूर्वी वेळोवेळी परवानगी देण्यात आलेल्या बाबी त्याकरिता निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार सुरु राहतील.
५. संदर्भीय आदेशान्वये वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश / मार्गदर्शक सूचना पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

कोविड-१९ च्या प्रतिबंधासाठी या कार्यालयाद्वारे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशांचे, मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करणारी व्यक्ती आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ५१ ते ६०, तसेच भारतीय दंड संहितेचे कलम १८८ नुसार अन्य कायदेशीर तरतुदीनुसार कार्यवाहीस पात्र राहील.

सदर आदेश दि. ०९/१०/२०२० पासून पुढील आदेशापर्यंत पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात लागू राहतील.

सदरचा आदेश हा माझ्या सही व शिक्क्यानिशी आज दिनांक ०९/१०/२०२० रोजी दिलेला आहे.

MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF POONA
पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन स्थापन-१९५०
EST.1950

(विक्रम कुमार)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

प्रत -१) मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे
२) मा. पोलीस आयुक्त,पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे.
३) मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे.

यांचेकडे माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित